**जायकवाडी प्रकल्पांतर्गत नेवासा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन शुद्धिपत्रक क्रमांक: पुनर्व-२०२६/प्र.क्र.०१ /पुनर्वसन-६**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक: ३० एप्रिल, २०२६

**वाचा-**

१) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.पुनर्व-२०२६/प्र.क्र.०१/पुनर्वसन-६,दि.२४.०३.२०२६

२) उपकार्यकारी अभियंता,मुळा पाटबंधारे विभाग,अहिल्यानगर यांचे पत्र जा.क्र.मुपावि/ प्रशा४/ २१२४/सन २०२६,दि.०१.०४.२०२६

**प्रस्तावना -**

जायकवाडी प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना संदर्भ क्र.१ येथे नमूद शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णयातील तक्त्यात अ.क्र.१ येथे नमूद मौजे खेडले काजळी या पुनर्वसित गावठाणांतील नागरी सुविधा कामाच्या नावामध्ये बदल करण्याची विनंती संदर्भीय क्र.२ येथे नमूद पत्रान्वये शासनास करण्यात आली असून त्यानुसार सदर दुरुस्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुद्धिपत्रक -**

जायकवाडी प्रकल्पांतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील पुनर्वसित गावठाणातील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबतच्या संदर्भीय क्र.१ येथे नमूद शासन निर्णयातील तक्त्यात अ.क्र.१ येथे नमूद नागरी सुविधा कामाचे नाव **“खेडले काजळी ते गोगलगाव शिव रस्ता सा.क्र.०/००० ते १/५२५ कि.मी. मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. नेवासा जि.अहिल्यानगर.”** ऐवजी **“खेडले काजळी ते गोगलगाव शिव रस्ता सा.क्र.०/००० ते १/५२५ कि.मी. मध्ये मजबुतीकरण व खडीकरण करणे ता. नेवासा जि.अहिल्यानगर”** असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४३०१०४७१४०६१९ असा आहे. हे शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MADHAV ASHOK BANTEWAD

Digitally signed by MADHAV ASHOK BANTEWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=0d181aa39b4d21e44d471606b7df670cbc65b3cb8d80b1ca27929265161d139a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1B720BC879C4DDAC69D0E7FC911BFC2A93205010890D544AFB10419754DA2525, cn=MADHAV ASHOK BANTEWAD
Date: 2026.04.30 10:48:03 +05'30'

**( माधव अ.बंटेवाड )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१. विभागीय आयुक्त तथा मुख्य नियंत्रण अधिकारी (पुनर्वसन) पुणे विभाग, नाशिक.
२. जिल्हाधिकारी तथा पुनर्वसन उपसंचालक, अहिल्यानगर.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर.
४. उप आयुक्त (पुनर्वसन),नाशिक.
५. कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग,अहिल्यानगर.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत).
७. महालेखापाल (लेखा परीक्षा ) महाराष्ट्र राज्य,मुंबई-१,नागपूर-२ (२ प्रतीत).
८. जिल्हा कोषागार अधिकारी, अहिल्यानगर.
९. जलसंपदा विभाग/मोप्र-२. मंत्रालय, मुंबई.
१०. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), अहिल्यानगर.
११. वित्त विभाग,कार्यासन व्यय-१० व अर्थसंकल्प-३, मंत्रालय, मुंबई.
१२. नियोजन विभाग,कार्यासन १४७५, मंत्रालय, मुंबई.
१३. महसूल व वन विभाग,कक्ष अधिकारी ब-१,पी.ए.सी. कार्यासन, मंत्रालय,मुंबई.
१४. निवड नस्ती कार्यासन र-८,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.